जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८८८ दिनांक - १९/१२/२०२३**

हडपसर पोलिस स्टेशन पुणे शहर

# फुरसुंगी हडपसर येथे किरकोळ वादावरून झालेल्या खुनाचे गुन्ह्यात ६ आरोपींना हडपसर पोलीसांकडून अटक

दिनांक १२/१२/२०२३ रोजी रात्रौ ०९:५५ वाजताचे सुमारास चंदवाडी,फुरसुंगी या ठिकाणी आरोपी विलास सकट व मयत अभिषेक संजय भोसले वय ३० वर्ष यांच्यात दिनांक १२/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वा.चे सुमारास झालेल्या किरकोळ वादाचे कारणावरुन आरोपी कैलास सकट व सचिन सकट व अनोळखी ७ ते ८ इसमांनी मिळुन फिर्यादी यास लाथा बुक्या व दगडाने मारहाण केली तसेच मयत यास लोखंडी धारदार शस्त्राने व दगडाने मारहाण करुन त्यांना जीवे ठार मारले म्हणुन हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१८९३/२०२३ भा.द.वि.कलम ३०२,३२३,१४३,१४५,१४८,१४९,५०४,५०६ भारतीय हत्यार कायदा कलम- ४(२५) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)सह १३५ अन्वये दाखल.

गुन्ह्याचे तपासात रविंद्र शेळेके,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पोलीस स्टेशन,तपासपथक प्रभारी अधिकारी सहा पो.निरी विजयकुमार शिंदे, पोलीस उप-निरी. अविनाश शिंदे आणि तपासपथक अंमलदार यांनी तपासाबाबत नियोजन केले.गुन्हा दाखल झालेवर आरोपी हे फरार झाले होते.

आरोंपीबाबत माहीती प्राप्त झाल्याने लागलीच पोलीस उप-निरी. अविनाश शिंदे आणि अंमलदार हे बारामती येथे रवाना झाले व दुसरे पथक वाघोली, पुणे येथे रवाना झाले होते. तपासादरम्यान आरोपी नामे १) विलास सुरेश सकट वय ३८ वर्षे, २) कैलास सुरेश सकट वय २० वर्ष ३) प्रमोद ज्ञानेश्वर राखपसरे वय १९ वर्षे, ४) प्रशांत ज्ञानेश्वर राखपसरे वय २१ वर्ष ५) सचिन संजय सकट वय २९ वर्ष ६) ज्ञानेश्वर प्रभु राखपसरे सर्व राहणारचंदवाडी,फुरसुंगी,पुणे यांना ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

आरोपींकडे केले तपासात आरोपी विलास सकट याने मयत अभिषेक संजय भोसले यांचेत दिनांक १२/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वा.चे सुमारास झालेल्या किरकोळ वादाचे कारणावरून खुन केल्याचे सांगतीले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पो.निरीक्षक नानासाहेब जाधव हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.आर राजा, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे श्रीमती अश्विनी राख, यांचे मागदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.रविंद्र शेळके, पोनि.(गुन्हे),श्री.विश्वास डगळे, पोनि.(गुन्हे) श्री.संदीप शिवले, यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक विजयकुमार शिंदे,पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार,सुशील लोणकर,संदीप राठोड,समीर पांडुळे,जोतीबा पवार,सचिन जाधव,प्रशांत दुधाळ,निखील पवार,अतुल पंधरकर,भगवान हंबर्डे,सचिन गोरखे,प्रशांत टोणपे,अजित मदने,चंद्रकांत रेजीतवाड,अमोल दणके,कुंडलीक केसकर,रामदास जाधव,यांचे पथकाने केली आहे.